# अटल अर्थसहाय्य योजना

## प्रकल्प मंजुरी नंतर सहकारी संस्थांनी करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या मार्गदर्शक सुचना

अटल अर्थसहाय्य योजनेचे संबंधित सहकारी संस्थेच्या प्रकल्पास राज्यस्तरीय समितीने मंजूरी दिल्यानंतर संबंधित सहकारी संस्थांनी खाली नमुद केलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी.

1) संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडून मंजुरी आदेश प्राप्त होताच सदर प्रकल्प राबविण्यासाठी व प्रकल्पासाठीचे व्यवहार पारदर्शक / सुस्पष्ट होण्यासाठी संस्थेने यापुर्वी उघडलेल्या बँक खात्यामधूनच योजनेशी निगडीत सर्व आर्थिक व्यवहार करावा.
2) संस्थेने सदर बँक खात्यामध्ये प्रकल्पाची स्वहिस्सा रक्कम जमा करावी.
3) प्रकल्पासाठी निवड केलेल्या जागेचा किमान 15 वर्ष कालावधीचा नोंदणीकृत भाडेपटटा करार (Register Lease) करावा.
4) प्रकल्पासाठी निवड केलेली जागा सहकारी संस्थेच्या स्वमालकीची असल्यास त्याबाबत 7/12 किंवा संबंधित कागदपत्रे जमा करावीत.
5) संस्थेच्या मंजुर प्रकल्पाची किंमत रु. 20.00 लाखापेक्षा अधिक असल्यास अशा प्रस्तावांना रु.15.00 लाख अनुदान व रु.2.5 लाख कर्ज रक्कमेच्या मर्यादेत मंजूरी देण्यात येत आहे. प्रकल्पाची उर्वरीत रक्कम संस्थांनी स्वहिस्सा म्हणून गुंतवणुक करून प्रकल्प वर्धनक्षम होत असल्यास, सदर संपुर्ण स्वहिस्सा खर्च झाल्यानंतरच कर्जप्रस्ताव दाखल करावा. सदर प्रकल्प रु.20.00 लाखातच वर्धनक्षम होत असल्यास रु.20.00 लाखाचा सुधारित वर्धनक्षमता अहवाल कर्ज प्रस्तावासमवेत दाखल करणेकरीता सनदी लेखापालाकडून तयार करावा.
6) सहकारी संस्थांनी मंजुरी मिळताच मंजुर प्रकल्प आराखडयानुसार कामे सुरू करावीत.
7) सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने वस्तु व सेवा यांच्या संपादनाची प्रक्रिया पार पाडताना संबंधित संस्थेने सहकारी संस्था अधिनियम 1960 व अधिनियम 1961 नुसार संबंधित शासन निर्णय, परिपत्रके यांचे पालन करावे. तसेच सदर संपादन प्रक्रिया ही पारदर्शक व स्पर्धात्मक असेल याची खबरदारी घ्यावी.
8) प्रकल्प किंमतीमधील खेळते भांडवलाचा किंवा उदा.गाई/ म्हैस/ शेळया/ मेंढया/ कोंबडया इ. खरेदी रक्कमेचा समावेश कर्ज व अनुदान रक्कमेमध्ये केला जाणार नाही.

9) **प्राथमिक व दुय्यम प्रक्रिया उदयोग (कृषि पुरक व इतर) किंवा कोणत्याही प्रकारची मशिनरीचा समावेश असणारे प्रकल्प**

I. उपरोक्त प्रकारच्या प्रकल्पामध्ये असणा-या प्रकल्प किंमती मध्ये 100% मशिनरीचा समावेश असल्यास संस्थेकडे उपलब्ध असलेले शेड/ गाळा हे किमान 15वर्षा करीता नोंदणीकृत भाडेपटटा करार (Registered Lease Agreement) असलेले किंवा स्वत: संस्थेच्या मालकीचे असल्याची खात्री करावी.

1. सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने वस्तु व सेवा यांच्या संपादनाची प्रक्रिया पार पाडताना संबंधित संस्थेने सहकारी संस्था अधिनियम 1960 व अधिनियम 1961 नुसार संबंधित शासन निर्णय, परिपत्रके यांचे पालन करावे. व सदर संपादन प्रक्रिया पारदर्शक व स्पर्धात्मक पद्धतीने पार पाडावी.
2. मशिनरी खरेदीसाठी संस्थेने संबंधीत पुरवठादारास पुरवठा आदेश द्यावेत. मशिनरी करिता पुरवठादाराने अग्रीमाची मागणी केली असल्यास संस्थेच्या स्वहिस्यातून देण्यात यावी. सदर व्यवहार संस्थेने धनादेश किंवा RTGS/NEFT व्दारे करणे बंधनकारक आहे. यामध्ये रु.२० हजारच्या वरील रोकड व्यवहार ग्राहय धरली जाणार नाही. अग्रीम रक्कमेचा तपशील, संस्थेचे बँक स्टेटमेंद, मशिनरी पुरवठादाराचे अग्रीम मिळालेबाबतची पावती (Payment Receipts), देयके इत्यादीची कागदपत्रे संस्थेने जतन करावीत आणि ज्यावेळेस संबंधित मोका तपासणी अधिकारी तपासणीस येतील त्यावेळी सर्व कागदपत्रे संस्थेकडे असणे आवश्यक आहे.

II. उपरोक्त प्रकल्प किंमतीमध्ये जर बांधकाम व मशिनरीचा समावेश असल्यास प्रथम जागेचा नोंदणीकृत भाडेपटटा करार संस्थेच्या / मालकीची असल्याचे उपरोक्त प्रमाणे खात्री करावी. यामध्ये सहकारी संस्थेस स्वहिस्सा हा प्रथमत: प्रकल्प अहवालामध्ये नमुद बांधकामावर / मशिनरी खरेदी / मशीनरी पुरवठादारास दिलेला आग्रीम या पद्धतीने खर्च करावा लागेल.

1. संस्थेने बांधकाम करताना प्रकल्प अहवालात नमुद अंदाजपत्रकानुसार कामे सुरू करावीत. यामध्ये बांधकामासाठी आवश्यक सिमेंट, वाळू, विटा, स्टील, पत्रा इत्यादी साहित्य प्रकल्प उभारणीस्थळी उपलब्ध असल्यास त्या संबंधीचा खर्च ग्राहय धरण्यात येईल. याकरीता संबंधीत जिल्हयाच्या DSR ला प्रमाण मानावे.
2. तपासणी अधिकारी हे झालेल्या कामाची नोंद घेतील. फोटो, देयके संस्थेचे बँक स्टेटमेंट व उभारलेली सुविधा यांची मोका तपासणी करतील.
3. संबंधितांना रक्कमा अदा करताना मुद्या क्रमांक ९ I (2) नुसार रक्कमांचे व्यवहार करावे.

## 10) गोदाम/ इतर स्थावर मालमत्ता उभारणी असणारे प्रकल्प

1. वरील प्रकल्पामध्ये शेतमाल व इतर मालाच्या साठवणुकीसाठी गोदाम उभारणीचा समावेश असेलेले तसेच मंगल कार्यालय उभारणी, प्रशिक्षण केंद्र उभारणी , कॅटल शेड, कोल्ड स्टोरेज यासारख्या प्रकल्पांचा समावेश असेल.
2. अशा प्रकल्पांची मोका तपासणी करताना प्रामुख्याने संस्थेकडे उपलब्ध असलेल्या जागेची खात्री करण्यात यावी. सदर जागा ही स्वत: संस्थेच्या मालकीची किंवा किमान 15 वर्षा करीता भाडेपटटा करार (Registered Lease Agreement) करण्यात आलेली असावी.
3. उपरोक्त प्रकल्पामध्ये सहकारी संस्थेने प्राधान्याने स्वहिस्सा हा प्रकल्पामध्ये नमुद बांधकामावरच खर्च करावा लागेल. संस्थेने प्रकल्प अहवालात नमुद बांधकामाची अंदाजपत्रकानुसार कामे सुरू करावीत. यामध्ये बांधकामासाठी आवश्यक सिमेंट, वाळू, विटा, स्टील, पत्रा इत्यादी साहित्य प्रकल्प उभारणीस्थळी उपलब्ध असल्यास त्यासंबंधीचा खर्च ग्राहय धरण्यात येईल. याकरिता संबंधीत जिल्हयाच्या DSR ला प्रमाण मानावे.
4. तपासणी अधिकारी हे झालेल्या कामाची नोंद घेतील आणि तसेच फोटो, बीले, संस्थेचे बँक स्टेटमेंट व उभारलेली सुविधा यांची मोका तपासणी करतील.
5. संबंधितांना रक्कमा अदा करताना मुद्या क्रमांक ९ I (2) नुसार रक्कमांचे व्यवहार करावे.

## 11) वाहतुक व्यवस्थापन व औजारे बँक

1. उपरोक्त प्रकल्पामध्ये अटल अर्थसहाय्य योजनेतंर्गत वाहतुक वाहन / मोबाईल रिटेल व्हॅन, ट्रॅक्टर, जेसीबी, टेम्पो, ट्रक, औजारे इ. बँक अशा प्रकारच्या प्रकल्पांचा समावेश असेल अशा प्रकल्पामध्ये सहकारी संस्था वाहन खरेदीसाठी स्वहिस्सा रक्कम सदर पुरवठादारास अग्रीम स्वरूपात देईल.यामध्ये वाहन खरेदीसाठी / औजारे बँक खरेदीसाठी सहकारी संस्थेने पुरवठादारास दिलेला आग्रीमाचा खर्च ग्राहय धरण्यात येईल.
2. वाहन खरेदीबाबतीत संस्थेस उपविक्रेता (Sub Dealer) यांचेकडून वाहन खरेदी करता येणार नाही. त्यामुळे याबाबत खात्री करावी.

3. संबंधित मोका तपासणी अधिकारी संस्थेने वाहन खरेदीसाठी पुरवठादारास दिलेले पुरवठा आदेश तसेच दिलेल्या अग्रीम रक्कमेचा तपशील, संस्थेचे बँक स्टेटमेंट, वाहन पुरवठादाराचे अग्रीम मिळालेबाबतची पावती (Payment Receipt), देयके इत्यादींची तपासणी करतील.
4. संबंधितांना रक्कमा अदा करताना मुद्या क्रमांक ९ I (2) नुसार रक्कमांचे व्यवहार करावे.

## 12) सहकारी रिटेल शॉप

1. उपरोक्त प्रकल्पामध्ये सहकारी संस्थेच्या कॉप शॉप, कृषि सेवा केंद्र, ग्राहक भांडार इत्यादी प्रकारच्या व्यवसायांचा समावेश असेल. यामध्ये प्रामुख्याने संस्थेकडे उपलब्ध असलेल्या जागेची खात्री करण्यात यावी. सदर जागा / गाळा हे स्वत: संस्थेच्या मालकीची किंवा किमान 15 वर्षा करीता नोंदणीकृत भाडेपटटा करार (Registered Lease Agreement) करण्यात आलेली असावी.
2. प्रकल्प किंमतीमधील खेळतेभांडवलाचा किंवा कॉप शॉप मधील विक्रीसाठी ठेवण्यात येणा-या मालाची खरेदी रक्कमेचा समावेश या योजनेतील कर्ज व अनुदान रक्कमेमध्ये केला जाणार नाही.
3. सदर प्रकल्पामध्ये नमुद बाबींप्रमाणे संबंधित सहकारी संस्थेने कामे सुरू करावीत. या मध्ये प्रामुख्याने शॉपचे बांधकाम असल्यास प्रथम बांधकाम सुरू करणे बंधनकारक आहे. त्यानुसार संस्थेने स्वनिधी याबाबीवरच खर्च करावा. यामध्ये बांधकामासाठी आवश्यक सिमेंट, वाळू, विटा, स्टील, पत्रा इत्यादी साहित्य प्रकल्प उभारणीस्थळी उपलब्ध असल्यास त्यासंबंधीचा खर्च ग्राहय धरण्यात येईल.
4. यानंतर संबंधित मोका तपासणी अधिकारी शॉपचे सुरू झालेले काम, देयके, कामाच्या नोंदी, संस्थेचे बँक स्टेटमेंट, फोटो इत्यादी तपासणी करतील.
5. जर या प्रकल्पामध्ये फक्त कॉपशॉपसाठी आवश्यक साहित्याचा समावेश असेल तर फर्निचर साहित्य, कॉम्पुटर, लॅपटॉप, प्रिंटिंर इत्यादी खरेदीची तपासणी करण्यात यावी. यामध्ये संस्थेने पुरवठादारास दिलेला पुरवठा आदेश व रक्कमेचा तपशील, संस्थेचे बँकेचे स्टेटमेंट व संबंधीत पुरवठादाराकडून पैसे मिळाल्याच्या पावत्या इत्यादीची तपासणी करण्यात येईल आणि संबंधित सहकारी संस्थेची स्वहिस्सा रक्कम खर्च झाल्याचे ग्राहय धरण्यात येईल.
6. संबंधितांना रक्कमा अदा करताना मुद्या क्रमांक ९ I (2) नुसार रक्कमांचे व्यवहार करावे.

**13)** सहकारी संस्थेने मंजुर प्रकल्प आराखडयानुसार कामे करत असताना खर्चा संबंधीत सर्व कागदपत्रे तसेच खर्च झाल्याचे संस्थेचे बँक स्टेटमेंट व खर्चाचा तपशील संबंधित तपासणी अधिका-यांना मोका तपासणीवेळी सादर करणे बंधनकारक आहे.

**14)** महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत अटल अर्थसहाय्य योजनेसाठी तयार करण्यात येणा-या MIS मध्ये वेळोवेळी सर्व कागदपत्राचा तपशील व Geo Tag केलेले फोटोग्राफस अपलोड करण्याची हमी संस्थेने द्यावी. सदर माहिती मुदतीत सादर करणे संस्थेस बंधनकारक आहे. यामध्ये संस्थेने दिरंगाई केल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

15) संस्थेने उभा केलेल्या प्रकल्प मोका तपासणीवेळी संस्थेच्या अध्यक्ष व सचिवासह किमान 5 ते 6 संचालक / सदस्यांनी उपस्थित असणे बंधनकारक आहे.

१६) संस्थेच्या प्रतिनिधींनी मोका तपासणी अधिका-यांना वेळोवेळी सहकार्य करणे आवश्यक आहे. तसेच वेळोवेळी आवश्यक माहिती सादर करणे बंधनकारक आहे.

17) सस्थेने मंजुर प्रकल्प आरखडयानुसार कामे सुरु केल्यापासुन ते पुर्ण होई पर्यतच्या प्रत्येक टप्प्यावरील बांधकाम, मशिनरी , वाहन तसेच इतर उभारण्यात येणा-या सुविधांचे फोटो तपासणी अधिका-यांना सादर करणे बंधनकारक आहे.

18) संस्थेने मंजुर प्रकल्प आरखडयानुसार कामे सुरू करताना प्रकल्पस्थळी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रकल्पाचा नामफलक लावणे बंधनकारक आहे.

19) संस्थेकडून स्वहिस्सा रक्कम खर्च होताच त्यांनी आवश्यक कर्ज मागणी प्रस्ताव विहीत नमुन्यात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्थां यांच्याकडे सादर करावा.

२०) आपला कर्जमागणी प्रस्ताव परिपुर्ण असल्यास संबधित जिल्हा उपनिबंधक हे आपल्या संस्थेच्या प्रकल्पाची मोका तपासणी करतील. तदनंतर आपला कर्जमागणी प्रस्ताव महामंडळाकडे पाठवतील.

२१) महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाकडून अटल अर्थसहाय्य योजने करिता वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन संस्थेकडून होईल याची नोंद घ्यावी.

22) संस्थेचा व्यवसाय प्रकल्प सुरू झाल्यापासून किमान 15 वर्ष सुरू राहील व त्याचा लाभ संस्थेच्या सभासदांना होईल याची खबरदारी संस्थेमार्फत घेण्यात यावी.

२३) अटल अर्थसहाय्य योजनेच्या शासन निर्णयानुसार सहभागी सहकारी संस्थेच्या किमान 2 सदस्यांनी प्रकल्पाशी निगडीत गरजेनुसार प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे. तरी सदर संस्थेने महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाकडून राबविण्यात येणा-या प्रशिक्षणासाठी नोंदणी करून प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे.

२४) संस्थेने मंजुर प्रकल्प आराखडयानुसार कामे करत असताना वेळोवेळी खर्चाच्याबाबतीत संचालक मंडळाची बैठक घेवून त्यासंबंधीचे ठराव संबंधीत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

25) संस्थेच्या प्रस्तावित प्रकल्प आराखडयानुसार कोणताही व्यवसाय सुरु करण्यापुर्वी संस्थेकडे त्यासंबंधित व्यवसाय विषयक विविध परवाने असणे बंधनकारक आहे. परवाण्याच्या अभावी प्रकल्प अंमलबजावणीस विलंब झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संस्थेच्या संचालक यांच्याकडे राहील.

२६) आपल्या संस्थेस प्राप्त मंजुरी आदेशातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणे देखील बंधनकारक आहे.

************************************************************